गोपनीय/अतितात्काळ

महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

क्र.पोमसं/२/१०(५)/बदल्या/१५/२०१८.
**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,**
**शहीद भगतसिंह मार्ग, कुलाबा,**
**मुंबई- ४०० ००१.**
दिनांक :- ०६/११/२०१८.

**संदर्भ** :- शासन आदेश, गृहविभाग, १) क्र. रापोसे-१७१८/प्र. क्र. २५५/पोल-१ (अ), दि.०६/११/२०१८ व
२) क्र. रापोसे-१७१८/प्र. क्र. २६६/पोल-१ अ, दि. ०६/११/२०१८.

**विषय** :- पोलीस उप अधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) व पोलीस उपअधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी) संवर्गातील अधिकाऱ्याच्या बदलीबाबतचे शासन आदेश कळविण्याबाबत.

* * * * *

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र अध्यादेश क्र. ३, दिनांक १ फेब्रुवारी, २०१४, मधील कलम २२ न मधील तरतुदींच्या अनुषंगाने, पोलीस उप अधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) संवर्गातील अधिका-यांच्या बदल्याबाबतचे संदर्भाधिन शासन आदेश याव्दारे कळविण्यात येत आहेत :-

| अ. क्र. | अधिकाऱ्याचे नांव | सध्याच्या नियुक्तीचे ठिकाण | नवीन नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | श्री. लक्ष्मण महादेव बोराटे | सहायक पोलीस आयुक्त, अमरावती शहर | वि.पो.म.नि., कोंकण परिक्षेत्र यांचे वाचक पोलीस उपअधीक्षक |
| २. | श्री. जयंत राजाराम कोळवते | पोलीस उपअधीक्षक, राज्य गुप्तवार्ता विभाग, मुंबई (बदली आदेशाधिन) | पोलीस उपअधीक्षक, संशोधन व विकास शाखा, पुणे |
| ३. | श्री. सुनिल मोहन सावंत | सहायक पोलीस आयुक्त, नियंत्रण कक्ष, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी), मुंबई | सहायक पोलीस आयुक्त, बिनतारी संदेश, सातांक्रुझ, मुंबई |

२. घटक प्रमुखांना विनंती करण्यात येते की,

**अ.** संदर्भाधिन शासन आदेशांच्या अनुषंगाने संबंधीत घटक प्रमुखांनी बदली झालेल्या अधिकाऱ्यांना तात्काळ कार्यमुक्त करून, तसा अनुपालन अहवाल सत्वर या कार्यालयास सादर करावा.

**आ.** ज्या ठिकाणी निवडणूक संबंधाने आचारसंहिता लागू आहे, त्या ठिकाणांच्या अधिकाऱ्यांना आचारसंहिता समाप्त झाल्यानंतर कार्यमुक्त करावे.

**इ.** बदलीवरील नवीन नियुक्तीच्या ठिकाणासंदर्भात मा.न्यायालयाचे, अथवा मा. न्यायाधिकरणाचे स्थगिती आदेश असल्यास, ते विचारात घेऊन पुढील कार्यवाही करावी.

**ई.** सदर बदलीवरील नवीन नियुक्तीच्या ठिकाणी कार्यमुक्त करण्याबाबतच्या आदेशांची प्रत संबंधीत अधिका-यांना **व्यक्तिशः** अदा करुन ती त्यांना प्राप्त झाल्याबाबत त्यांची दिनांकासहित स्वाक्षरी घ्यावी, व ती पोच या कार्यालयास पाठवावी.

**उ.** उपरोक्त आदेशांच्या अनुषंगाने संबंधीत अधिकाऱ्यांना बदलीवर **विनाविलंब कार्यमुक्त** करुन त्यांनी त्यांच्या नवीन नियुक्तीच्या पदावर तातडीने हजर होण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करुन अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

**ऊ.** सदर बदलीच्या आदेशांमुळे ज्या जागा रिक्त होणार आहेत, त्या ठिकाणांचा कार्यभार संबंधीत घटक प्रमुखांनी त्यांच्या घटकातील इतर पोलीस उपअधीक्षकांकडे सोपवावा.

ए. उपरोक्त आदेशाच्या अनुषंगाने संबंधीत अधिका-यांना त्यांच्या बदलीवरील नवीन नियुक्तीच्या ठिकाणी कार्यमुक्त केल्याची, तसेच ते नवीन नियुक्तीच्या ठिकाणी रुजू झाल्याची तारीख तात्काळ या कार्यालयास कळवावी. तसेच, ते जर बदलीवर नवीन नियुक्तीच्या ठिकाणी हजर झाले नाहीत तर तसे या कार्यालयास कळवावे, आणि त्यांच्याविरुध्द या कार्यालयाच्या क्र. २/५५०७, दि. १६/०९/१९८३, ११/०१/१९८४, व १०/०२/१९९१, तसेच क्र. पोमसं/३/५५०७/६/९७, दि. १३/०२/१९९७ च्या परिपत्रकातील सूचनांप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करावी.

**( कुलवंत कु. सारंगल )**
अपर पोलीस महासंचालक (आस्थापना)
पोलीस महासंचालक यांचेकरिता.

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह).
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, बिनतारी संदेश, महाराष्ट्र राज्य, पुणे.
पोलीस आयुक्त, अमरावती शहर
विशेष पोलीस महानिरीक्षक, कोंकण परिक्षेत्र, नवी मुंबई.

प्रत सविनय सादर :-

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग, दुसरा मजला, मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.
( **लक्षवेध :- श्री. अ. अ. खोचरे,** कक्ष अधिकारी)

प्रत:-

महालेखाकार-१ (लेखा व अनुज्ञेयता) / महालेखाकार-२ (लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर (सस्नेह).
संबंधीत जिल्हा कोषागार अधिकारी (सस्नेह).
पोलीस अधीक्षक, राज्य पोलीस नियंत्रण कक्ष, मुंबई.
कार्यासन अधिकारी, का. क्र. २-अ, ९, ३६, व ४०.
**पोलीस उपअधीक्षक, संगणक कक्ष**

२. प्रस्तुत बदलीचे आदेश **"पोलीस उपअधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त बदली"** या शिर्षाखाली महाराष्ट्र पोलीस दलाच्या संकेत स्थळावर पुढील पंधरा दिवसांसाठी प्रसिध्द करावे.

राज्य पोलीस सेवेतील पोलीस उप अधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) या संवर्गातील अधिकाऱ्याची बदलीने पदस्थापना...

# महाराष्ट्र शासन

## गृह विभाग

शासन आदेश क्र.रापोसे-१७१८/प्र.क्र.२५५/पोल-१(अ)
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक :-६ नोव्हेंबर, २०१८.

**शासन आदेश** :-

महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) अधिनियम, २०१४ च्या कलम २२ (न) मधील तरतुदीनुसार पोलीस उप अधीक्षक /सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) या संवर्गातील खालील पोलीस अधिकाऱ्यांची बदली त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी करण्यात येत आहे :-

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नांव | सध्याच्या नियुक्तीचे ठिकाण | नवीन नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | श्री.लक्ष्मण महादेव बोराटे | सहायक पोलीस आयुक्त, अमरावती शहर | पोलीस उप अधिक्षक, वाचक, विशेष पोलीस महानिरीक्षक, कोंकण परिक्षेत्र |

२. वर नमूद अधिकाऱ्याच्या बाबतीत, मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण अथवा अन्य मा. न्यायालयाचे आदेश, तसेच निवडणूक आचारसंहिता असल्यास, ते विचारात घेऊन तात्काळ पुढील कार्यवाही करण्यात यावी.

३. संबंधित अधिकाऱ्यांस बदलीच्या ठिकाणी हजर होण्यासाठी नियंत्रक अधिकारी यांनी कार्यमुक्त करण्याबाबतची आवश्यक कार्यवाही करावी व संबंधित अधिकारी यांनी बदलीच्या ठिकाणी रुजू होऊन तसा अहवाल शासनास सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(कैलास गायकवाड)
उप सचिव, गृह विभाग

प्रति,

महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

राज्य पोलीस सेवेतील पोलीस उप अधीक्षक /
सहायक पोलीस आयुक्त, बिनतारी संदेश
(अभियांत्रिकी) या संवर्गातील अधिकाऱ्याची
बदलीने पदस्थापना...

# महाराष्ट्र शासन

## गृह विभाग

शासन आदेश क्र.रापोसे-१७१८/प्र.क्र.२६६/पोल-१(अ)
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक :-६ नोव्हेंबर, २०१८.

**शासन आदेश** :-

महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) अधिनियम, २०१४ च्या कलम २२ (न) मधील तरतुदीनुसार पोलीस उप अधीक्षक /सहायक पोलीस आयुक्त, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी) या संवर्गातील खालील पोलीस अधिकाऱ्यांची बदली त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी करण्यात येत आहे :-

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नांव | सध्याच्या नियुक्तीचे ठिकाण | नवीन नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | श्री. जयंत राजाराम कोळवते | पोलीस उप अधीक्षक, राज्य गुप्तवार्ता विभाग, मुंबई (बदली आदेशाधीन) | पोलीस उप अधीक्षक, संशोधन व विकास शाखा, पुणे |
| २ | श्री. सुनिल मोहन सावंत | सहायक पोलीस आयुक्त, नियंत्रण कक्ष, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी), मुंबई | सहायक पोलीस आयुक्त, बिनतारी संदेश, सांताक्रुझ, मुंबई |

२. वर नमूद अधिकाऱ्याच्या बाबतीत, मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण अथवा अन्य मा. न्यायालयाचे आदेश, तसेच निवडणूक आचारसंहिता असल्यास, ते विचारात घेऊन तात्काळ पुढील कार्यवाही करण्यात यावी.

३. संबंधित अधिकाऱ्यांस बदलीच्या ठिकाणी हजर होण्यासाठी नियंत्रक अधिकारी यांनी कार्यमुक्त करण्याबाबतची आवश्यक कार्यवाही करावी व संबंधित अधिकारी यांनी बदलीच्या ठिकाणी रुजू होऊन तसा अहवाल शासनास सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(कैलास गायकवाड)
उप सचिव, गृह विभाग